**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913

तात्काळ

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२१/ 565
दिनांक :- 19/3/2021

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय / विद्यापिठांतर्गत शाखा
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवीका संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करीता गुणवत्ता याद्याची पडताळणीकरीता आवश्यक प्रपत्र भरुन सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/गुया/२०२१/५६२ दिनांक १७/३/२०२१.
२.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/प्रवेश यादी सुचना/२०-२१/२४५ दिनांक १२ मार्च २०२१.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करण्यात येते की, या विभागीय कार्यालयांतर्गत येत असलेली अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवीका संस्थेचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादी तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी या कार्यालयास पाठविलेले प्रपत्रात (Softcopy) अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवीका व थेट व्दितीय वर्ष पदवीका तसेच प्रथमवर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवीका इत्यादी अभ्यासक्रमाची माहीती वेगवेगळया फाईल मध्ये भरुन (Softcopy) (पेनड्रार्व्हमध्ये) या कार्यालयास त्यासोबत जोडलेल्या दिनांकास प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर करण्यास संदर्भ १ अन्वये आपणास कळविलेले आहे.

तथापी याबाबत आपणास कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये सदरची माहीती सादर करतांना त्यासोबत खालील नमुद कागदपत्रे सादर करण्यास कळविलेले असून माहीती सादर करतांना सदर कागदपत्रे सादर करावी.

१.आपल्या संस्थेस सक्षम प्राधिकरणाच्या AICTE/PCI यांच्या मान्यतेची प्रत तसेच सबंधित अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी दिलेल्या सलग्नता प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थांनी व्दितीय वर्षासाठी आवश्यक असलेली संचालक व संस्थेच्या नावाने काढलेली मुदतठेव सादर करावी.

३.सबंधित संस्थांनी ठेवलेल्या आवश्यक रकमेच्या मुदतठेव (FD) ची साक्षांकीत छायांकीत प्रत सादर करावी.

४.विद्यार्थ्यांना संचालनालयामार्फत देण्यात येणा-या शिष्यवृत्तीची सद्यस्थिती काय आहे याची माहीती संस्थाप्रमुखांनी प्रमाणित करुन सादर करावी.

**आपला विश्वासू,**

**(डॉ. आर.पी. मोगरे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.